**शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे**

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७

एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा



**मंगल कार्यालय**

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.

**सौभाग्य मंगल कार्यालय**

आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, **मो.: ९०९६९६६२२२**



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २१२ वा | रविवार, दि. ३० मार्च २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# 'सरकार काय बोळ्याने दूध पितं का?' पश्या, राहुल्याची लायकी आहे का?

## खा. उदयनराजे भोसलेंचा सरकारला घरचा आहेर



**सातारा (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जनता पक्षाचे खासदार उदयनराजे भोसले यांनी आज माध्यमांशी संवाद साधत राज्य सरकारवर जोरदार टीका केली. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारंवार होणाऱ्या अवमानावरून उदयनराजे भोसले यांनी सरकारला घरचा आहेर दिला आहे. तसेच सर्व पक्षातील लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन एक विशेष अधिवेशन बोलवावं आणि तात्काळ कायदा पारित करावा, अशी मागणी देखील त्यांनी केली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वारंवार आक्षेपार्य विधाने केली जातात, या मुद्यांवर बोलताना सरकार काय बोळ्याने दूध पितं का?, असं म्हणत खासदार उदयनराजे भोसले यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

**उदयनराजे भोसले काय म्हणाले?**

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह विधान केली जातात, या विरोधात सरकारने कडक कायदा करण्याची मागणी उदयनराजे भोसले यांनी केली. तसेच हा कायदा पारित करण्यासाठी विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी त्यांनी केली. या संदर्भात बोलताना उदयनराजे भोसले म्हणाले की, ह्माझं असं म्हणणं आहे की जर त्यांनी विशेष अधिवेशन बोलावलं नाही तर याचा अर्थ असा होईल की छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान व्हावा ही त्यांची सर्वांची इच्छा दिसते. मग लोकांनी यांना त्यांची जागा दाखवून द्यावीह्व, असं उदयनराजे भोसले यांनी म्हटलं.

**'बोळ्याने दूध पितात का?'**

तुम्ही ज्या पक्षाचे खासदार आहात, त्याच पक्षाचे सरकार आहे, त्याच पक्षाचे मुख्यमंत्री आहेत. मग मुख्यमंत्री तुमचं ऐकत नाहीत असं तुम्हाला वाटतं का? असा सवाल माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारला, यावर उदयनराजे भोसले म्हणाले की, ह्एक लक्षात घ्या, वारंवार किती वेळा सांगायचं? एकदा सांगितलं, दोनदा सांगितलं. त्यांना सर्वांना कळायला हवं ना? ते काय बोळ्याने दूध पितात का? जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान होतो तेव्हा त्यांना दिसत नाही का? दंगली होतात, अनेकांचे प्राण जातात. याला कारणीभूत कोण? जर तुम्ही कायदा पारित केला नाही तर हेच सर्व यासाठी जबाबदार आहेतह्व, असं म्हणत उदयनराजे भोसले यांनी टीका केली.


**वाघ्या कुत्र्याच्या समाधीबाबत मांडली भूमिका**

वाघ्या कुत्र्याच्या समाधी संदभार्तील तुम्ही तुमची भूमिका स्पष्ट केली नाही, असा प्रश्न विचारण्यात आला असता यावर खासदार उदयनराजे भोसले म्हणाले, 'वाघ्या, वाघ्या, कोण वाघ्या? येथे एकच वाघ होऊन गेले ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज. तसेच वाघ्या कुत्र्याच्या समाधीबाबत एक इतिहासकारांची समिती नेमली पाहिजे. मग ती समाधी तिथे कधी आली? का आली? इतिहासात तर अशी नोंद नाही. काहीका असेना. पण त्या माध्यमातून योग्य तो निर्णय घ्यावा', असं उदयनराजे भोसले यांनी म्हटलं आहे.

**शासन मान्य इतिहास का प्रकाशित झाला नाही?**

'छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांना तुम्ही आधारस्तंभ मानता ना? मग अजून त्यांचा शासन मान्य इतिहास प्रकाशित का झाला नाही? अनेक महापुरुषांचा शासन मान्य इतिहास मान्य झाला. पण तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांनाच विसरलात?', असं उदयनराजे भोसले यांनी म्हटलं. 'तसेच मराठ्यांच्या ज्या राजधान्या होत्या, राजगड असेल किंवा रायगड, सातारा, यासाठी एक शिव स्वराज्य सर्केट स्थापन केलं पाहिजे', अशी मागणी देखील उदयनराजे भोसले यांनी केली.


श्रीहरी बहुउद्देशीय व संशोधन संस्था,संचलित,



**शार्वी अभ्यासिका**

जुळे सोलापूरातील पहिली अत्याधुनिक

* वैशिष्ट्ये *

* वातानुकूलित सुसज्ज इमारत, प्रसन्न वातावरण व माफक फी
* मुलां-मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था * स्वतंत्र प्रसाधनगृह
* आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प * प्रदुषणमुक्त वातावरण
* वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन * वाहन तळाची सोय
* शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था * प्रत्येक जागा आरक्षित
* दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
* लॅपटॉप,मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईंट *मर्यादित प्रवेश क्षमता * वर्षभरासाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत

संपर्कासाठी पत्ता

एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर.

संपर्कः-९६५७०६९०६९/८८५६९२७९४७






लि.ष. ब्र. १०८
रेणुक शिवाचार्य महास्वामीजी

गुढी उभारून आकाशी,
बांधून तोरण दाराशी,
काढून रांगोळी अंगणी,
हर्ष पेरूनी मनोमनी,
करू सुरुवात नववर्षाची...



श्री. निरंजन देवरू
उत्तराधिकारी, मंद्रुप



श्री. वे. मु. शिवानंद ईरय्या हिरेमठ
(श्री शिवयोगेश्वर मठाचे उत्तराधिकारी)

शुभेच्छुक
**श्री शिवयोगेश्वर ट्रॅव्हल्स, मंद्रुप**
श्री. वे. मु. शिवानंद ईरय्या हिरेमठ
मु. पो. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.
मोबाइल : ९८३४०१०२११ / ७५०७५०५१८८








## संपादकीय

# भाषणबंदीचा आरोप

'लोकसभेच्या सभागृहामध्ये आपल्याला भाषण करू दिले जात नाही किंवा कोणत्याही विषयावर मत व्यक्त करू दिले जात नाही', अशा प्रकारचा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केल्यामुळे एका नव्या चर्चेला विषय मिळाला आहे. अर्थात, राहुल गांधी यांनी केलेल्या या आरोपानंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहातील सर्व सदस्यांनी नियमांचे पालन करून सभागृहाचे पावित्र्य जपायला हवे अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केली आहे.एक प्रकारे राहुल गांधी यांच्याकडून काही नियमांचा भंग झाल्यामुळे त्यांना अशा प्रकारे बोलू दिले जात नाही असा युक्तिवाद अप्रत्यक्षपणे ओम बिर्ला यांनी केला आहे. अर्थात, कोणत्या नियमांचा भंग केला आणि त्यामुळे लोकसभागृहाच्या पावित्र्याला धक्का पोहोचला याची माहितीच नसल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला आहे.

लोकसभेचे कामकाज कशाप्रकारे चालावे याबाबत जो 349 क्रमांकाचा नियम आहे त्यामध्ये लोकसभेतील सदस्यांनी सभागृहात कशाप्रकारे वर्तन ठेवावे याची मोठी यादी सांगण्यात आली आहे. त्या यादीतील कोणत्या नियमाचे पालन करण्यात राहुल गांधी अपयशी ठरले याचा कोणताही खुलासा ओम बिर्ला यांनी केला नाही. पण राहुल गांधी यांनी जेव्हा लोकसभेच्या सभागृहामध्ये आपल्याला बोलायला मिळावे अशी मागणी केली तेव्हा त्यांनी लोकसभेचे कामकाज स्थगित करण्याचा निर्णय घेतला. विरोधी पक्षनेते असो किंवा इतर सदस्य असो त्यांनी काही किमान नियमांचे पालन करावे अशा प्रकारची अपेक्षा ओम बिर्ला यांनी व्यक्त केली असली तरी त्यामुळे कोणताही स्पष्ट खुलासा झालेला नाही, उलट संभ्रम वाढला आहे.

सध्या सुरू असलेल्या लोकसभेच्या अधिवेशनामध्ये राहुल गांधी यांना महाकुंभमेळावर बोलायचे होते, तसेच देशातील बेरोजगारीच्या विषयावर त्यांना भाषण करायचे होते. पण या दोन्ही विषयांवर आपल्याला बोलण्याची परवानगी मिळाली नाही असा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. सभागृह लोकशाही मार्गाने चालवले जात नाही, असा गंभीर आरोपही त्यांनी लोकसभेच्या अध्यक्षांवर केला आहे. गृहात एखाद्या विषयावर जेव्हा चर्चा सुरू होते तेव्हा प्रत्येक राजकीय पक्षांच्या नेत्यांना त्यांच्या सदस्य संख्येच्या प्रमाणात काही मिनिटे चर्चेमध्ये बोलण्यासाठी दिली जातात. राहुल गांधी यांच्या पक्षाची सदस्य संख्या किंवा त्यांना मिळालेले विरोधी पक्ष नेतेपद पाहता नेहमीच त्यांना भाषणासाठी जास्त कालावधी दिला जातो किंवा विरोधी पक्ष नेत्याला जास्त कालावधी देण्याची प्रथाही आहे. पण गेल्या काही कालावधीपासून राहुल गांधी यांनी सभागृहात कोणते मुद्दे मांडू नयेत याच दिशेने कामकाज सुरू असल्याचे दिसते. किमान तसा आरोप तरी काँग्रेस पक्षाकडून केला जात आहे. विरोधी पक्षाचा सभागृहामध्ये योग्य सन्मान राखला जात नाही अशी तक्रारही काँग्रेसच्या सत्तर खासदारांनी लोकसभेच्या अध्यक्षांकडे केली आहे. काही वर्षांच्या कालावधीपासून लोकसभेचे व्यासपीठ असो किंवा इतर प्रतिनिधीगृहांची व्यासपीठ असोत तेथे गोंधळ करणे हाच एक कलमी कार्यक्रम राबवला जातो आणि सर्वसाधारणपणे हा गोंधळ विरोधी पक्षांकडून अपेक्षित असला तरी अनेक वेळा सत्ताधारी पक्षांच्या सदस्याकडूनही गोंधळाचे नियोजन केले जाते. विशेषतः सरकारला अडचणीत आणणारा एखादा विषय जर पटलावर आला असेल तर अशा प्रकारचा गोंधळ निर्माण करून त्या विषयावर चर्चा होणार नाही याची काळजी सत्ताधारी पक्षांची शाउटिंग ब्रिगेड नेहमी घेत असते.

सभागृहाचा नेता म्हणून पंतप्रधान आणि सभागृहातील विरोधी पक्ष नेता यांची भाषणे सुरू असताना काही मूलभूत नियमांचे पालन करणे अपेक्षित धरले असते. पण पंतप्रधानांचे भाषण सुरू असतानाही गोंधळ करणे किंवा विरोधी पक्ष नेत्याला बोलू न देणे हाच विषय गेल्या काही दिवसांपासून समोर येत असल्याने राहुल गांधी यांनी केलेल्या या आरोपाकडे त्याच दृष्टिकोनातून पाहावे लागणार आहे. एकीकडे सभागृहाच्या बाहेर भाजपाच्या किंवा त्यांच्या मित्र पक्षांच्या नेत्यांकडून राहुल गांधी यांची नेहमीच खिल्ली उडवली जात असताना लोकसभेत त्यांना बोलू का दिले जात नाही हा संशोधनाचा विषय ठरू शकतो. नवे सरकार अस्तित्वात आल्यानंतर लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनापासूनच लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला आणि राहुल गांधी यांच्यामध्ये काहीतरी बिनसल्याचे आत्तापर्यंत लक्षात आले आहे.

अर्थात लोकसभेचा अध्यक्ष हा जरी निवडणुकीमध्ये कोणत्या एका पक्षाकडून निवडून आला असला तरी अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसल्यावर त्याने निःपक्षपातीपणे काम करणे अपेक्षित असते. पंतप्रधान आणि विरोधी पक्ष नेता या दोन महत्त्वाच्या पदांचा योग्य सन्मान राखण्याचे काम लोकसभेच्या अध्यक्षांनाच करावे लागते. आता राहुल गांधी यांच्यासारख्या विरोधी पक्ष नेत्यानेच ओम बिर्ला यांच्या पद्धतीबाबत संशय व्यक्त केल्यामुळे सरकारलाच पुढाकार घेऊन आता संशयमुक्त वातावरणात लोकसभेचे कामकाज चालवले जाईल यासाठी काहीतरी करावे लागणार आहे.

लोकसभा असो किंवा विधानसभांची सभागृहे असोत त्या ठिकाणी विरोधी बाकावरील सदस्य ठामपणे मुद्दा मांडत असेल तर गोंधळ करणे किंवा त्यांचा माइक बंद करणे अशा प्रकारच्या गोष्टी केल्या जात असल्याचे विषयही समोर येत आहेत. नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशनामध्येसुद्धा विरोधी पक्ष सदस्यांचे माइक बंद करण्यात आल्याचा आरोप झाला आहे. या परिस्थितीमध्ये लोकप्रतिनिधीगृहांचे काम लोकशाही मार्गाने चालवले जात नाही असा आरोप जर राहुल गांधी यांनी केला असेल तर त्याचा विचार करावाच लागणार आहे.

# विकृत कुतूहल बाळगू नका !

दुसऱ्याच्या दाराला कान लावून त्याच्या घरात काय चाललं आहे? घरातील लोक एकमेकांशी काय बोलत असतील? भांडण तर चालू नाहीत ना? नवीन काय करण्याचा घरातील लोकांचा उद्देश आहे का? हे पाहण्याची किंवा ऐकण्याची उत्सुकता म्हणजेच 'विकृत कुतूहल' होय. साध्या सोप्या भाषेत सांगायचं, तर 'आपलं ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याचं बघायचं वाकून' यालाच 'विकृत कुतूहल' म्हणतात.

खरंतर मनुष्याला निसर्गाविषयी, जीवसृष्टी, अंतराळ,विश्वाची उत्पत्ती याबाबत नैसर्गिक कुतूहल होते.या कुतूहलातूनच त्याने अनेक शोध लावले. अनेक नियम, सिद्धांत, गृहतके मांडली. आज प्रगतीचा टप्पा जो मनुष्याने गाठला आहे, तो या नैसर्गिक कुतूहलामुळेच शक्य झाला आहे. विकृत कुतूहल हे नैसर्गिक कुतूहलाचे विकृत रूप आहे. दुसऱ्याच्या जीवनातील वाईट गोष्टी आणि भानगडी ची माहिती मिळवण्यासाठी धडपडणे विकृत कुतूहल ठरते.चित्रपट मालिका, कलाकार, खेळाडू,राजकीय नेते मंडळी आणि इतर सुप्रसिद्ध लोकांच्या बाबतीत खाजगी गोष्टी प्रसार माध्यमातून मजेने चघळल्या जातात. त्यातून खूप वेळा खोट्या गोष्टीच प्रसिद्ध केल्या जातात. काही वेळेस तर स्वतः कलाकार मंडळी स्वतःला चर्चेत आणण्यासाठी अशा काही गोष्टी प्रसार माध्यमांना हाताशी धरून प्रसिद्ध करतात. अशा उठवलेल्या वावड्या लोकांना आवडत असतात. लोक मजेने त्यावर तासन् तास चर्चा करतात. तर्क वितर्क लढवतात.आपला किंमती वेळ कोणा दुसऱ्याच्या खाजगी जीवनातील गोष्टीवर चर्चा करण्यासाठी घालवणे, खरंच असंस्कृतपणाचेच लक्षण आहे.प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जीवनातील खासगीपणा जपण्याचा अधिकार असतो. भारतीय संविधानातील जीवन जगण्याच्या स्वातंत्र्याच्या अनुषंगाने हा स्वतःच्या खाजगीपणा जपण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. आपली पत्नी,मुले आणि इतर कुटुंब सदस्य यांच्या भावभावना, आवडीनिवडी आणि इतर खाजगी गोष्टी प्रत्येक कुटुंबातील सदस्यांनी जपल्या पाहिजेत.

घोड्यांच्या रेसमध्ये झापडबंद घोडे असतात. ते आजूबाजूंच्या घोड्यांकडे पाहत नसतात. ते फक्त आपल्या ट्रॅक मध्येचं धावतात. त्याप्रमाणेच आपण देखील नाकासमोर चालल पाहिजे. स्वतःच्या ताटातच लक्ष ठेवलं पाहिजे. इतरांच्या जीवनात लुडबुड करण्याचा कोणताही अधिकार आपल्याला नसतो. विकृत कुतूहलाची भावना ही काही वेळेस द्वेष भावनेतूनच निर्माण होते. दुसऱ्याचे वाईट झाले पाहिजे, तो जीवनातून उठला पाहिजे, त्याच्या घरात सतत भांडण तंटा व्हायला हवा, त्याची प्रगती खुंटली जावी, अशा विकृत भावनांतूनच विकृत कुतूहल तयार होते. दुसऱ्याच्या सुखदुःखाची, प्रगती, उत्कर्षाची, यशा अपयशाची त्याचं व्यक्तीकडून चौकशी करणे नेहमी योग्य ठरते. यातून गैरसमज होऊ शकत नाहीत. सहसंबंध दृढ होण्यास वाव मिळते. विकृत कुतूहला च्या माणसाच्या गुणधर्माला लक्ष ठरवून आज-काल मोठ्या प्रमाणात वेब सिरीज आणि चित्रपट बनवले जात आहेत. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात हिंसाचार, लैंगिकता आणि नैतिकतेचे अधपतन होत असलेला गोष्टी दाखवल्या जातात. एक प्रकारे सामान्यजनाचे विकृत कुतूहल वाढवण्याचे आणि त्याला खतपाणी घालण्याचा काम प्रसार माध्यमातून होत असते. समाज माध्यमावरून सकारात्मक गोष्टींपेक्षा, नकारात्मक घटनांना मोठ्या प्रमाणात लक्ष केले जात आहे. यातून लोकांच्या विकृत कुतूहलाची भावना वाढत आहे. कोणी कोणावर टीका केली या बातमीला एकाने दुसऱ्याला केलेल्या मदतीच्या बातमीपेक्षा जास्त महत्त्व दिले जाते. जनकल्याणकारी काम करणाऱ्याची कुठेही दखल घेतली जात नाही; याउलट गुन्हेगार, तोतया आणि घोटाळेबाज यांच्या मागे कॅमेरा घेऊन प्रसार माध्यमे धावताना दिसतात. हॉरर शो, क्राईम शो पाहणारे प्रेक्षक आज मोठ्या प्रमाणात आहेत.

एकूणच आपल्यातील विकृत कुतूहल या अपप्रवृत्तीला ओळखून, तो सोडून देण्याचा विचार केला पाहिजे.



**किशोर जाधव सोलापूर**
मो. नं. ९९२२८८२५४१

## प्रबोधन

# गुढीचे आयुष्य । काही तासांचे नसावे

गुढी उभी करणे हा मराठी भाषेच्या प्रश्नपत्रिकेतील एका गुणाचा प्रश्न. ज्या विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना गुढी उभी करणे म्हणजे पराक्रम करणे हे उत्तर लिहिलं, त्यांनाच एक मार्क मिळाला आणि ज्यांनी चैत्र शुद्ध प्रतिपदेला वेळूच्या उंच काठीला धुऊन, हळदकुंकू लावून, साडी-चोळी नेसवून, लिंबाच्या डहाळ्या, चाफ्याची फुलमाळ, साखरी पदकाच्या माळा लावून दाराच्या उजव्या बाजूला उभारणं, असं लिहिलं, त्या विद्यार्थ्याला मिळाला शून्य गुण! म्हणूनच नवं युग केव्हा सुरू झालं, हे ज्यांना शोधावंसं वाटेल त्यांनी हा वाक्यप्रचार केव्हा, कुणी वापरला हे पाहावं. मात्र ज्यांनी गुढीचा लक्ष्यार्थ ध्यानात ठेवला ते सुधारले; पण ज्यांनी वाच्यार्थ घेतला, ते मात्र पुढारले नाहीत, हेच खरं!

वाच्यार्थाने आपण सारेच गुढी उभी करतो. पण भारताला ज्यांनी सन १९१३मध्ये साहित्य क्षेत्रातील नोबेल पुरस्कार मिळवून दिला, ते गीतांजलीकार रवींद्रनाथ टागोर यांनी उभी केली, ती गुढी मात्र दुसऱ्या कोणा साहित्यकाराला शंभर वर्षांत उभी करणं जमलेलं नाही. भौतिकशास्त्रात भारतरत्न चंद्रशेखर व्यंकटरमण यांनी १९३०मध्ये नोबेल पुरस्कार प्राप्त करून रामन इफेक्टच्या सिद्धान्ताच्या रूपाने जी गुढी उभारली, तीदेखील पुन्हा उभारणं अन्य भारतीय शास्त्रज्ञबंधूंना शक्य झालं नाही. भारतात अणुशक्तीची स्थापना पं. नेहरूंच्या प्रेरणेने डॉ. होमी. जे. भाभा यांनी करून भारताला एका नव्या विश्वात आणण्याची गुढी मोठ्या प्रयत्नाने, हिमतीने उभी केली. पण त्यांच्या प्रयत्नांचा अर्थ समजण्याची आपली योग्यता नाही, हे आपण नव्या अणुभट्ट्या उभारण्याला विरोध करून सिद्ध करीत आहोत.

भारताला खूप मोठा इतिहास आहे. पण तो इतिहास नव्हे, तर केवळ भूतकाळ आहे. पारतंत्र्याचा भूतकाळ, गुलामीचा भूतकाळ, लाचारी आणि दैन्याचा भूतकाळ या गुलामीतून बाहेर पडून स्वातंत्र्याची गुढी उभारणारे राजा पोरस, महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्य सौदामिनी महाराणी ताराराणी या सर्व विभूती विश्ववंद्य आहोत. आधुनिक युगात मात्र जगाने आश्चर्यचकित व्हावं, असा अद्धितीय इतिहास अहिंसेच्या माध्यमातून लिहून मानवतेची थोर गुढी, उभी केली महात्मा गांधीजींनी! या गुढीला बळ दिलं होतं शैव परंपरेने, गौतम बुद्धांच्या बौद्ध धमार्ने, तीर्थंकरांच्या जैन धर्माने, बसवेश्वरांच्या लिंगायत धर्माने, चक्रधरांच्या महानुभाव संप्रदायाने आणि वारकरी पंथाने. ज्ञानोबा-तुकोबांच्या बलिदानानेही विजय प्राप्त होतो आणि महात्म्यता प्राप्त होते, हा थोर बळीराजाचा आदर्श महात्माजींनी आपणापुढे ठेवला म्हणूनच आज महात्मा गांधी हे साऱ्या जगाला ललामभूत झाले आहेत. नव्या युगाचा खरा प्रारंभ महात्माजींमुळे झाला.

मराठी भाषेची गुढी उभी केली, थोर महानुभाव चक्रधरांनी. आपल्या शिष्याला नागदेवाचार्याला तुमचे अस्मात कस्मात - माज्या भोळ्याभाबड्या माणसांना कळत नाही, अशी त्यांनी संस्कृत भाषामाध्यमाची परखड चिकित्सा केली आणि माहिमभट्टाने लीळाचरित्र मराठीत लिहिलं. माहिमभट्टाने लीळाचरित्र मराठीत लिहिलं. महदाईसा या त्यांच्या शिष्येने मराठीच्या धवळे या काव्यग्रंथाने आद्य कवयित्रीचा मान पटकावला. या परंपरेमुळेच ज्ञानदेवांच्या लेखणीतून माझा मराठीचा बोल कवतिके। परी अमृताते पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन ॥ अशा मराठीच्या गौरवाची गुढी उंच उंच उभी करण्यात आली खरी; पण तिचं कोडकौतुक दिवसेंदिवस ओसरत चाललं असून शिक्षणातून ती हद्दपार होत आहे. मराठीच्या दारात इंग्रजीची गुढी उभी केली जाणे, ही चिंतेची बाब आहे.

हिंदू धर्माच्या पूर्वावताराने-वैदिक धर्माने-वर्णाश्रमाची स्थापना करून भारतीय समाजाचे हजारो तुकडे केले. पण जातिभेदांविरुद्ध पुरोगामी मतांची गुढी ज्या महापुरुषांनी उभी केली, तेच खरे भारतमातेचे सुपुत्र आहेत. महात्मा गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, महात्मा जोतिबा फुले, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज, महात्मा गांधी यांच्या कायार्मुळे, विचारांमुळेच आजचं समाजसंघटन अधिक मजबूत झालं आहे. अन्यथा भारत शतखंड झाला असता. छत्रपती शाहूंनी तर अन्यायी, पक्षपाती हिंदू धर्म त्यांच्या धर्माधिकाऱ्यासह नाकारून जी क्रांतीची गुढी उभी केली, ती अजोड आहे. हिंदू धर्माच्या प्रस्थापित आचारव्यवहारावर मात करण्यासाठी समाज प्रबोधनाच्या गुढ्या ज्या महात्म्यांनी उभारल्या, ते सारेच थोर आहेत. जगद्गुरू तुकोबाराय, महात्मा फुले, लोकहितवादी देशमुख, छत्रपती शाहू, प्रबोधनकार ठाकरे, डॉ. आंबेडकर डॉ. पंजाबराव देशमुख यांनी नवसमाजनिर्मिती केली. यशवंतराव चव्हाणांनी मराठी पराक्रमाची गुढी दिल्लीवर उभी करून थोर इतिहास निर्माण केला, तर ना.बाळासाहेब देसाई यांनी आर्थिक मागासांच्या शिक्षणातील अडथळा दूर केला. ना.वसंतदादा पाटील यांनी विनाअनुदानित शिक्षण संस्थांना शासनानुमती देण्याची गुढी उभी केली, हे नव्या युगाचं स्वागत ठरलंय. भारतीय समाजाची अनेक दुर्लक्षित क्षेत्रं आपल्याला नव्या युगात नेणारा केव्हा येईल, याची आतुरतेने वाट पाहताहेत, आपल्या अंगणात कधी गुढी उभी राहील याची चिंता करताहेत. हे आव्हान स्वीकारणं हे शहाण्या देशप्रेमी सुपुत्रांचं आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी लक्षात असू द्या-

काठीला गुढीचे । रूप तुम्ही दिले
पूजनही केले । भक्तिभावे ॥ १
वषार्नुवर्ष । उभारली गुढी
निर्जीव ती रूढी । अर्थशून्य ॥२
गुढीचे आयुष्य । फक्त काही तास
कशासाठी त्रास । घ्यावा सांगा ॥ ३
नवा अर्थ आता । विद्यार्थी सांगेल
गुढीला येईल । नवा अर्थ ॥४
नव्या व्यवस्थेची । स्थापना करावी
गुढी ती मानावी । चिरस्थायी ॥५
कुजक्या प्रथांना । हटवा धीराने
गुढी उभारणे । आहे तेच! ॥६
आपले सामर्थ्य। विक्रमी ठरावे
गुढी त्या म्हणावे । वंदनीय ॥७
नवजीवनाला । स्फूर्ती जी देईल
गुढी म्हणवील । तीच प्रथा ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते मा. मुख्यमंत्री महोदयाचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी त्यांच्या समवेत पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सर्वश्री समाधान आवताडे, अभिजीत पाटील, गोपीचंद पडळकर, सचिन कल्याणशेट्टी, बाबासाहेब देशमुख, माजी आमदार राम सातपुते, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार,



विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद,जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री तसेच मंदिर समितीचे सदस्य उपस्थित होते.

तत्पूर्वी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यामध्ये श्री विठ्ठल गर्भगृह, श्री रुक्मिणी गर्भगृह, श्री विठ्ठल चारखांबी व सोळखांबी, बाजीराव पडसाळी, महालक्ष्मी मंदिर आदी ठिकाणची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या.

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात 'कृषी क्षेत्रातील उच्चशिक्षण संधी' व्याख्यान संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन आणि विकास संस्था संचालित लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात "कृषी क्षेत्रातील उच्चशिक्षण संधी" या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला व्याख्याते म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी वैभव गायकवाड (एम. एस. सी. पर्यावरणशास्त्र) हे लाभले होते. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृषी जैवतंत्रज्ञान या शाखे बदल माहिती सांगितली तसेच कृषी जैवतंत्रज्ञान क्षेत्रात पदवीधरांसाठी राष्ट्रीय बियाणे कंपन्या वनस्पती उतीसंवर्धन प्रयोगशाळा याठिकाणी शास्त्रज्ञ, तांत्रिक अधिकारी, याचबरोबर महाराष्ट्र राज्य सेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून कृषी अधिकारी, कृषी सहायक यामध्ये असलेल्या करियरच्या संधी तसेच



कृषी आधारीत कृषी सेवा केंद्र, फळप्रक्रिया उद्योग, कृषी विपणन यासारख्या व्यवसायाच्या विविध संधी यांची माहिती दिली. यासोबतच त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी तयारी कशी करावी, विद्यार्थ्यांनी त्यासाठी कोणकोणत्या स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात, तसेच या परिक्षांच्या माध्यमातून विद्यार्थी कोणकोणत्या शिष्यवृत्ती मिळवू शकतात याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र कृषि शिक्षण परिषदेमार्फत व राष्ट्रीय कृषी संशोधन परिषदेमार्फत घेण्यात येर्णाया एम. एस. सी. कृषी व पी. एच. डी. कृषी या परिक्षांविषयी, त्यामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक तयारीविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा करून आपल्या शंकाचे निरसन करून घेतले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन होते. या कार्यक्रमास प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा मानदेशमुख, प्रा. अंकिता पवार, प्रा.आशिष सरकाळे तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# अशासकीय लिपिक टंकलेखक पदासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात भरती

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक-टंकलेखकाचे अशासकीय एक पद मेस्को मार्फत भरावयाचे आहेत. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह दिनांक 03 एप्रिल 2025 पुर्वी जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

जिल्ह्यातील माजी सैनिक तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांच्या रोजगार पटावर नोंद असलेल्या युध्द विधवा युध्दजन्य कारणाव्यतिरिक्त दिवंगत झालेल्या सैनिकांच्या विधवा पत्नी यांना प्राधान्य देण्यात येईल. सदर प्रवगार्तील उमेदवार उपलब्ध न झाल्या माजी सैनिकांच्या विधवा पत्नी या पदासाठी पात्र ठरतील. प्राप्त अर्जामधील उमेदवारांची दिनांक 03 एप्रिल 2025 रोजी मुलाखती घेण्यात येईल.

सदर पदाकरीता मराठी टंकलेखनाचा वेग दर मिनिटास किमान 30 शब्द असल्याचे वाणिज्य प्रमाणपत्र तसेच महाराष्ट्र शासनाचे एमएससीआयटी प्रमाणपत्र धारण केलेले किंवा मराठी टंकलेखन येणे अनिवार्य राहील. जिल्ह्यातील माजी सैनिक, युध्द विधवा, माजी सैनिकांच्या पत्नी यांनी लाभ घ्यावा. असे आवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# समता पंधरवडा निमित्त जातवैधता प्रमाणपत्राकरीता विशेष मोहिमेचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने ह्यसमता पंधरवडाह्णचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने दि 01 ते 14 एप्रिल 2025 या कालावधीत 'समता पंधरवडा' असून समता पंधरवड्यात 11 वी आणि 12 वी विज्ञान शाखेतील तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम 2025-26 मधील सर्व प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधताप्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान विज्ञान शाखेतील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जात पडताळणी प्रकरणे तालुका व महाविद्यालय निहाय संख्यात्मक माहिती समान संधी केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालय तसेच जिल्हास्तरावर संकलित करण्यात येणार आहेत. समता पंधरवडयात सीईटी देणारे विद्यार्थी डिप्लोमा तृतीय वषार्तील प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज देखील भरण्यात येणार आहेत.

तसेच अर्ज भरताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी संबंधित महाविद्यालयातील समान संधी केंद्रामार्फत वेबिनारचे आयोजन देखील करण्यात येणार आहे. समानसंधी केंद्राच्या माध्यमातून सर्वमागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज जमा करण्यात येणार असून प्राप्त अर्जावर तत्काळ कार्यवाही करून वैधता प्रमाणपत्र देण्याचे नियोजन जातपडताळणी समितीच्या वतीने करण्यात येणार आहे.

जिल्हयातील विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थी, सीईटी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करून या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सदस्य रविंद्र कदमपाटील यांनी केले आहे

# महाराष्ट्रात खाजगी प्लेसमेंट एजन्सींसाठी नवे नियम; विधेयक दोन्ही सभागृहात संमत

**मुंबई,(कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील खाजगी प्लेसमेंट एजन्सींवर नियंत्रण आणण्यासाठी आणि युवकांना फसवणुकीपासून संरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्र सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक 2025 हे विधेयक दोन्ही सभागृहांनी संमत केले असून, यामुळे राज्यातील नोकरी शोधणाऱ्या युवकांसाठी अधिक सुरक्षित आणि पारदर्शक प्रणाली तयार होणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या कारकिर्दीत युवकांच्या कौशल्य विकासासाठी, रोजगारासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. विधानपरिषद सदस्यांनी महाराष्ट्र राज्यात रोजगार मेळाव्याची वाढलेली संख्या, त्याचा युवकांना होणार लाभ, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध होत असलेल्या रोजगाराच्या संधी असे सर्व निर्णय दूरदर्शी व मार्गदर्शक ठरणार असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक 2025 आणण्याचा निर्णय सुद्धा ऐतिहासिक ठरेल असे विधानपरिषद सदस्यांनी नमूद केले. या विधेयकामुळे बनावट भरती प्रक्रियेतून होणारी बेरोजगारांची फसवणूक थांबवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करून उमेदवारांचे रोजगारात्मक हित जोपासले जाईल.

या विधेयकाबाबत बोलताना मंत्री लोढा म्हणाले, "माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांनी राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर प्रत्येक विभागाला 100 दिवसाचा कार्यक्रम तयार करण्यास सांगितले होते. कौशल्य विकास विभागाच्या 100 दिवस कार्यक्रमात सदर विधेयक असावे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आणि त्यानुसार आम्ही महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक 2025 सादर करत आहोत. या विधेयकामुळे तरुणांच्या हक्कांचे संरक्षण होईल आणि प्लेसमेंट एजन्सीवर सुद्धा अंकुश राहील. आता प्रत्येक प्लेसमेंट एजन्सी सरकारच्या नोंदणीकृत चौकटीत असेल, त्यामुळे पारदर्शकता येईल आणि युवकांचा विश्वासही वाढेल."

राज्यातील युवकांना देशातील आणि परदेशातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, पादयोजन संस्थांना सहकार्य करून त्यांचा सहभाग वाढवणे, त्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणणे तसेच संस्थानाच्या गुणवत्तापूर्वक कामांना प्रोत्साहन देणे हे सदर विधेयकाचे उद्दिष्ट आहे.

## वात्रटिका

### वादा भुले दादा

गुडघ्याला बांधून बाशिंग
केला होता यांनी वादा...
काम साधून निघाले आणि
विसरून गेले दादा...
बहिणीला लाभ नाही
शेतकऱ्यांना माफी नाही...
दिल्याचे फक्त सोंग हे
काही काफी नाही...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# रांझणी भिमानगर ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी प्रितम पाटील यांची निवड

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** रांझणी भिमानगर ता माढा या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी सौ प्रितम अक्षय पाटील यांचा एकमेव अर्ज आल्याने सौ प्रितम पाटील यांची निवड बिनविरोध करण्यात आली मा.सरपंच सौ संगिता पाटोळे यांनी राजीनामा दिल्याने हि जागा रिक्त झाली होती.माढा तालुक्याचे मा.आमदार बबनराव शिंदे यांचे कट्टर समर्थक मा कृषी व पशुसंवर्धन सभापती संजय पाटील भिमानगरकर यांच्या नेतृत्वाखाली गेली तीस वर्षे निर्विवाद वर्चस्व असलेल्या ग्रामपंचायतीत लाखो रुपयांची कामे आजपर्यंत झाली असून अनेक रस्ते व सार्वजनिक कामांना मा. आमदार बबनराव शिंदे यांनी आजपर्यंत भरभरून निधी दिला आहे व येणाऱ्या काळात देखील असाच ग्रामपंचायतीचा विकासासाठी अहोरात्र मेहनत घेण्याची तयारी आहे असे मत मा कृषी व पशुसंवर्धन सभापती संजय पाटील भिमानगरकर यांनी व्यक्त केले.



यावेळी पांडुरंग पाटील, वसंत पाटील, विनोद चव्हाण,मोहन पाटील, राहुल चौगुले, प्रमोद कदम, विजय सरवदे, दादाराम गुटाळ, रोहित गायकवाड, दिलीप चव्हाण, खंडू कदम, अर्जुन चव्हाण, ज्ञानदेव भिसे, शिवाजी भिसे, तुकाराम चौगुले, विजय पतुले, दिलीप पाटील, पंडित पाटील, सतिश पाटील,राजेंद्र पाटील, गणेश पाटील, उत्रेश्वर पाटील, बाळासाहेब पाटील, दत्तात्रय पाटील, अक्षय पाटील, प्रशांत पाटील, प्रदीप पाटील, प्रदीप बाबर, रामभाऊ मेटे, पृथ्वीराज पाटील, संदिप पाटील, राजवर्धन जगताप,भरत मस्के, नितीन मस्के, अशोक मोहिते, वसंत चव्हाण, मा. सरपंच सुनिता संजय पाटील,संगिता पाटोळे, सोनाली पांडुरंग माने, मंदाकिनी दत्तात्रय पाटील, चंचला विजय पाटील, दिपाली तानाजी गायकवाड, धनश्री सचिन नलवडे, नेताजी चमरे, तानाजी गायकवाड, मल्हारी गवळी, श्रीकांत ढगे, सचिन नलवडे, सचिन चव्हाण, अर्जुन पाटील, नेवरे भाऊसाहेब, सुदाम देशमुख, पिंटू सल्ले, मुकुंद बागल, धनंजय ढवळे, साहेबराव जाधव, वरूण पाटोळे व ग्रामस्थ उपस्थित होते.

सरपंच पदी निवड झाल्यानंतर सौ प्रितम पाटील म्हणाल्या येथून पुढच्या काळात ग्रामपंचायतीच्या विकासासाठी संजयदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मी कटीबद्ध राहिल.

**सौ प्रितम अक्षय पाटील,**
नुतन सरपंच

# मुख्यमंत्री यांच्याकडून परिचारक कुटुंबियांची सांत्वन पर भेट

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे वडील श्री प्रभाकर परिचारक यांचे मागील दोन महिन्यापूर्वी वृद्धपकाळाने निधन झालेले होते. तरी आज मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री प्रशांत परिचारक यांच्या पंढरपूर येथील निवासस्थानी त्यांची व कुटुंबियाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार कल्याणशेट्टी, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार प्रशांत परिचारक, उमेश परिचारक आदी उपस्थित होते.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. २२५/२०२५
नि नं. ६

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो, यांचे कोर्टात**

१)जहिराबी महिबुब चाबुकस्वार, वय५८ वर्षे, धंदा- घरकाम रा. एमआयजी६५, जुना विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर. २)आयेशा रियाज सरोडगी, वय३८ वर्षे, धंदा- घरकाम,रा.४९,मीरा पिठाची गिरणी समोर, मीरा नगर, जुळे सोलापूर, सोलापूर. ३)निलोफर कलीमोद्दीन मुच्छाले, वय३५ वर्षे, धंदा- घरकाम रा.३४३,मुस्लिम पाच्छा पेठ, जिंदा शहा मजार चौक, सोलापूर. ४)हिनाकौसर तौफिक चाबुकस्वार,वय३४ वर्षे,धंदा-घरकाम रा. एमआयजी६५, जुना विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर. ५)मेहजबीन अकबर सय्यद उर्फ सवेद, वय३३ वर्षे, धंदा- घरकाम रा. संघर्ष नगर, चांदीवली, बिल्डींग पं. ०९/एफ१, फ्लॅट नं.५०२,ओमसाई लि.मुंबई साकीनाका, मुंबई-४०००७२. ६)फिरदौस मुस्तईन सय्यद, वय- ३१ वर्षे, धंदा- घरकाम रा. ५ए, दक्षिण सदर बझार, लष्कर, सोलापूर. ७)सदफ मोईद्दीन सिध्दीकी, वय२९ वर्षे, धंदा- घरकाम, रा.२५५, सिध्देश्वर नगर-५, मजरेवाडी, सोलापूर. ८)गोहर तौसीफ सिद्दीकी, वय- २७वर्षे, धंदा- घरकाम, रा.२५५, सिध्देश्वर नगर-५, मजरेवाडी, सोलापूर. } अर्जदार

विरूध्द

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी यांतील अर्जदार नं. १ ते ८ यांनी महेबुब उर्फ महिबुब म. कासिम चाबुकस्वार यांचे दि. ०९/०४/२०२२ रोजी निधन झाल्यामुळे त्यांचे नांवे असलेली मिळकत - डी. व सब. डी. शहर सोलापूर, ता. उत्तर सोलापूर पैकी, सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाढीतील कसबे सोलापूर येथील पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, जुळे सोलापूर भाग-२ मधील विडी घरकुल योजनेतील 'सी' ग्रुपमधील भुखंड क्र. ६५ याचे क्षेत्र १३५.०० चौ.मी. या मिळकतीस मयताचे वारसदार म्हणून अर्जदार नं. १ ते ८ यांचे नाव नोंद होणेसाठी प्रस्तुतचा वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार नं. १ ते ८ यांचे नावाने वारस प्रमाणपत्र देण्यासंबंधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आंत अथवा नेमलेली तारीख ३/५/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर रहावे. तसे न झाल्यास अर्जदाराच्या नावाने वारस प्रमाणपत्र कोणाची काही हरकत नाही असे समजून अर्जदाराचे नावे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल. ही जाहीर प्रसिध्दीकरण माझ्या सहीनिशी व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे दि. २८/३/२०२५.

क. लिपीक (शिक्का)

हुकुमावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तरसो.
सोलापूर

# सर्व्हरच्या कासव गतीमुळे दस्त नोंदणीसाठी आलेल्या नागरिकांना नाहक त्रास

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** गेल्या काही दिवसापासून नोंदणीविभागाचे सर्व्हर हे अत्यंत सावकाश व संतगतीने चालत आहे. यामुळे दस्त नोंदणीसाठी आलेल्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्वरित सर्व्हरची दुरुस्ती करून नागरिकांना होणारा त्रास दूर करावा अन्यथा दस्त नोंदणी विभागा विरुद्ध तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रदेश काँग्रेस युवक सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिला आहे.

पुढे बोलताना रोहन सुरवसे पाटील म्हणाले की लाखों, करोडो रुपयांचे स्टॅम्प व नोंदणी फी भरून देखील ते चलन डिफेस न झाल्यामुळे नागरिकांना ४०मिनिटात पूर्ण होणारी नोंदणीसाठी तब्बल एक दिवस अथवा दोन दिवसाचा कालावधी जात आहे. आणि हे त्रास दायक आहे. चलनाद्धारे लाखो करोडचा स्टॅम्प भरून देखील ते चलन सिस्टीम स्वीकारण्यासाठी वेळ घेत असेल व नागरिकांचा अमूल्य वेळ वाया घालवत आहेत हे कितपत योग्य आहे. अर्थात पैसे देऊन देखील फक्त मनस्तापला सामोरे जावे लागत आहे हे दुदैव म्हणावे लागेल.



नोंदणीच्या पावतीवर अद्याप दस्त सादर केल्यापासून फक्त ४० मिनिटात स्कॅन होईल अशी वेळ दिले जाते.सध्या स्कॅनिंग बंद या समस्याचा नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या वेळेचा आणि त्यांच्या भावनांचा विचार करून त्वरित सर्व्हरची अडचण दूर करावी असे रोहन सुरसे पाटील म्हणाले.

> दस्त नोंदणी विभागामध्ये गेल्या काही दिवसांपासुन मुद्रांक शुल्क वाढणार या भीतीने मार्चच्या 15 तारखेपासुन प्रचंड गर्दी ही नोंदणी कार्यालयामध्ये होत आहे कोटयावधींचा स्टॅम्प डुटी भरून देखील लोंकाना सुविधा तर सोडा सर्वर स्लोचा सामना करावा लागत आहे दस्त नोंदणी पासुन दस्त स्कॅनिंग पर्यंत एका दस्तास दोन तास प्रक्रिया चालत आहे तसेच ऑनलाईन रजिस्ट्रेशन मध्ये रेंट अँगरिमेंट हे एका ऑफिसमध्ये तीनसेहुन अधिक दस्त रोज पेंडीग आहेत परंतु नोंदणी महानिरीक्षक रविंद्र बिनवडे हे याकडे पुर्णपने दुर्लक्ष करीत आहेत.
>
> **रोहन सुरवसे-पाटील**
> सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस

# मुख्याध्यापक अनिल झोळ यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** राजुरी ता.करमाळा येथील राजेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल सोपान झोळ यांचा सेवानिवृत्ती निमित्त विद्यालयात गुरूवारी दि. २७ रोजी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.अध्यक्षस्थानी संस्थापक सचिव लालासाहेब जगताप होते. मुख्याध्यापक अनिल झोळ यांचा सपत्नीक सत्कार वैजनाथ स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने करण्यात आला. यावेळी लालासाहेब जगताप यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मुख्याध्यापक झोळ यांच्या सुरूवातीपासून ते सेवानिवृत्ती पर्यंत चा खडतर परिश्रमातून केलेल्या वाटचालीत उजाळा देत त्यांच्या सेवेबद्दल गौरवउद्गार व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. झोळ यांनी सन १९८९ ते २०२५ अशी एकुण ३६ वर्ष सेवा दिली. यामध्ये ३० वर्षे सहशिक्षक व ६ वर्षे मुख्याध्यापक म्हणून काम केले.



कार्यक्रमासाठी कृषी अधिकारी देविदास सारंगकर, प्रा.संजय चौधरी, गंगाराम वाघमोडे, शरदचंद्रजी पवार विद्यालय वाशिंबे मुख्याध्यापक रमेश यादव व सर्व शिक्षकवर्ग, राजूरी, मांजरगाव, येथील माजी विद्यार्थी व पंचक्रोशीतील मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक धनंजय साखरे यांनी केले.तर आभार मारुती साखरे यांनी मानले.

अमेरिका येथे उच्चपदावर कार्यरत असलेले शाळेचे माजी विद्यार्थी संतोष सारंगकर यांनी मुख्याध्यापक झोळ यांना भ्रमणध्वनीवरुन शुभेच्छा दिल्या. झोळ व शाळेतील अन्य शिक्षकांना त्यांनी भेटवस्तूही पाठवल्या .तर विद्यार्थ्यांसाठी १ लाख २० हजार किमतीची ४० बाकडेही सारंगकर यांनी शाळेस भेट दिली आहे.

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक: SLP/00७४८/१८/२५
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:-३१२/२०२५

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग, सोलापूर.**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक तुळजाभवानी मंदिर कचरेवाडी बाबत ।
न्यासाचा पत्ता:- मालमत्ता नं. ६०२ अट पोस्ट कचरेवाडी, टालुक माळशिरस, डिस्ट्रिक्ट सोलापूर, सोलापूर, माळशिरस, कचारेवाडी
अर्जदार-हनुमंत नामदेव सरगर,

सर्व संबंधित लोकास जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य | अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Pateli 2 Nag 50,55 No. | 16500 | 18 | lahan pateli 5 nag | 4200 |
| 2 | Pateli 2 Nag 40,42 No. | 12500 | 19 | Swaipak Shegadi 1 Nag | 5500 |
| 3 | Pateli Zakan 4 Nag | 1500 | 20 | Lahan Dubbe 10 Nag | 1200 |
| 4 | Puri Parat 2 Nag | 4000 | 21 | Lokhandi Kapat 1 Nag | 7500 |
| 5 | Badali 6 Nag | 18000 | 22 | Bhandi Rack 1 Nag | 2000 |
| 6 | Pati 8 Nag | 1600 | 23 | Jevnachi Tat 70 Nag | 14000 |
| 7 | Vagreli 8 Nag | 680 | 24 | Vati 70 Nag | 3850 |
| 8 | Bhatwadi 6 Nag. | 360 | 25 | Tambe 18 Nag | 1620 |
| 9 | Danda Vagreli 2 Nag | 550 | 26 | Glass 30 Nag | 1050 |
| 10 | Ultane 2 Nag | 850 | 27 | Chandichi Nath 1 Nag | 750 |
| 11 | Panchpali 2 Nag | 1000 | 28 | Devichi Sadya 15 Nag | 9000 |
| 12 | Polpat 5 Nag | 1000 | 29 | Tambyacha Sinh 1 Nag | 1500 |
| 13 | Lahan Ultane 5 Nag | 300 | 30 | Samaiee 1 Nag | 1250 |
| 14 | Lokhandi Tave 5 Nag | 1250 | 31 | Arati Tat 1 Nag | 350 |
| 15 | Belane 5 Nag | 400 | 32 | Kalash 1 Nag | 750 |
| 16 | Joint Shegadi 1 Nag | 1900 | 33 | Udbatti Stand 1 Nag | 35 |
| 17 | Gas Taki 1 Nag | 3900 | 34 | Tambychi Ganta 1 Nag | 4700 |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. १२५५४५/- मात्र(अक्षरी रुपये एक लाख पंचवीस हजार पाच शे पंचेचाळीस मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्णन):-

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| मौजे कचरेवाडी ता माळशिरस, जि. सोलापूर | मालमत्ता क्रमांक ६०२ अनुक्रमांक ७७० | मं. बांध, दगड वीट आरसीसी ११x१३ सभा मं. ३५x५५ | No | Temple | 0.00 |
| मौजे कचरेवाडी ता माळशिरस, जि. सोलापूर | मालमत्ता क्रमांक ६०२ अनुक्रमांक ७७० | खु.जा.२९३२चौफु यांचे ए.क्षे ५००० चौ. फु अथ. ४६८.६८चौमी | No | Temple | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. ०/- मात्र

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ११-०३-२०२५ रोजी दिली.

(कोर्टाचा शिक्का)

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय,सोलापूर विभाग,सोलापुर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किशिळ अर्ज क्र. १२४/२०२५

**सोलापर येथील मे दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो यांचे न्यायालयात**

१. श्रीनिवास गणपती गडगी वय ७२ वर्षे, धंदा- रा-प्लॉट नं. २४, विष्णूनगर, नवी जिंदगी चौक जवळ, सोलापूर २. राघवेंद्र श्रीनिवास गडगी वय-३३ वर्षे, धंदा- व्यापार रा-प्लॉट नं- २४, विष्णूनगर, नवी जिंदगी चौक जवळ, सोलापूर ३. चंद्रकला नागराज मादगुंडी वय ५२ वर्षे, धंदा- घरकाम रा. प्लॉट नं-४ राघवेंद्र नगर, जुना कुंभारी नका सोलापूर. } अर्जदार

विरूध्द

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी अर्ज कलम १ मधील मिळकत हि कै. मलम्माबाई श्रीनिवास गडगी यांचे मालकी व कब्जे वहीवाटीची होती व आहे. अर्जदार क्र. १ हे त्यांचे पती आहेत व अर्जदार क्र. २ हा त्यांचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. ३ हि त्यांची मुलगी आहे. कै. मलम्माबाई श्रीनिवास गडगी यांचा मृत्यू दि- २०/१२/२००४ रोजी झाला. त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस व प्रतिनिधी हे अर्जदार क्र.१ ते ३ हेच आहेत. अर्जदार क्र. ३ चे लग्ना पूर्वीचे नाव कलावती श्रीनिवास गडगी होते. अर्जदार क्र. १ ते ३ व्यतिरिक्त अन्य कोणीही कै. मलम्माबाई श्रीनिवास गडगी यांचे कायदेशीर वारस व प्रतिनिधी नाही. जिल्हा व उपजिल्हा पैकी तालुका

सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मिळकत क्र. ६५२८७३ प्लॉट नं २४ विष्णुनगर भाग २ सोलापूर येथील. पूर्व : रस्ता पश्चिम: प्लॉट नं २३, उत्तर: प्लॉट नं २२, दक्षिण: रस्ता

येणेप्रमाणे वर्णनाची व चतु:सिमेतील घरजागा मिळकत आतील तदंगभूत वस्तूसह व वाहिवाटीच्या हक्कासह मिळकत.

त्याअर्थी सदर अर्जाचे कामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून मे कोर्टात नेमलेली ता२९/४/२०२५रोजी स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आपले लेख म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी केली जाईल व सदर अर्जदार नं. १ ते ३ यांना वारसा प्रमाणपत्र देण्याचे हुकुम करण्यात येईल. हे अर्ज दि२८/३/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिदध केले असे.

लिपीक (शिक्का)

हुकुमावरून
सह अधिक्षक
दिवाणीकोर्ट व. स्तर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि . क्रि.अ . क : २३६ /२०२५

**मोहोळ येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन साो, यांचे कोर्टात**

१) माळप्पा नामदेव ईश्वरकट्टी वय - ३३ वर्षे, धंदा- मजूरी भिव्ड
२) तिपण्णा नामदेव ईश्वरकट्टी वय-३२ वर्षे, धंदा-मजूरी दोघे रा. २११ महाराणा प्रताप झोपडपट्टी शांती निकेतन शाळेजवाळ कुमठा नाका सोलापूर
३) नागव्वा संतोष संकपाळ (लग्ना नंतर) नागव्वा नामदेव ईश्वरकट्टी (लग्ना पूर्वी ) वय - ३१ वर्षे, धंदा घरकाम रा. ५९ जवळकर वस्ती सम्राट चौक सोलापूर अर्जदार } अर्जदार

विरूध्द

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात वॉम्वे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे . अर्जदार नं. १ ते ३ यांची आई नामे शशिकला नामदेव ईश्वरकट्टी हे दि. ०८/०७/२०२४ रोजी सोलापूर येथे निधन झाले आहे. त्यांचे नावे डिस्ट्रिक्ट व सव डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी ता उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील नवीन हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील महाराणा प्रताप झोपडपट्टी मधील म्युनिसिपल झोपडी नं/ घर नं: २११ लगत यांसी महानगरपालिका मिळकत क्र. ६५३८१९ याचे ऐकूण क्षेत्र ५०० चौ. फुट इतके असून यामध्ये दोन पत्राशेड खोली असून वाकीची खुली जागा आहे. ही मिळकत असून अर्जदारांचे नांवे मिळकतीचे रेकॉर्डला म्हणजेच मिळत दप्तर सदरी धारक नांवाची नोंद होणेकरिता अर्जदार यांनी त्यांचे नांवे वारसा दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थीसदर अर्जाचे कामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत किंवा नेमलेली ता.२९/०४/२०२५ रोजी स्वतः अथवा व वकीला मार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची ही हरकत न आल्यास, कोणाची ही हरकत नाही, असेसमजून या अर्जाची चौकशी होवून मे. कोर्ट पुढील योग्यते आदेश करतील.

आज दि. २८ माहे ०३/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

लिपीक (शिक्का)

हुकुमावरुन
अधिक्षक

**Classified - छोटी जाहीरात**

**विकणे आहे**

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411

# शालेय विद्यार्थ्यांवर दुष्कर्म करणाऱ्या कर्मचाऱ्यांस निलंबित करा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील एका नामांकित शाळेतील शिशु वगार्तील चिमुरड्या मुलीवर गेल्या सहा महिन्यापासून अत्याचार करणाऱ्या त्या शाळेतील कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात यावे व संबंधित शालेय प्रशासनावरही कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्षा मीनल दास यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्त यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

बदलापूर येथील अत्याचाराची घटना ताजी असताना सोलापूर शहरांमध्ये हा प्रकार घडलामुळे शालेय विद्यार्थी व पालक अतिशय भयभीत झाले असून त्यांच्यामध्ये असुरक्षित ची भावना निर्माण झाली आहे शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक असतानाही अनेक शाळेमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित नाही तसेच अनेक शाळेमध्ये विशाखा समिती व तक्रारपेटी फक्त कागदोपत्री दाखवण्यात आलेली आहे याकडे शिक्षण विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष आहे विशाखा समितीची बैठक महिन्यातून एकदा घेण्यात यावे असे असताना सुद्धा अनेक वेळा बैठका झालेले नाहीत असे प्रकार वरचेवर वाढत जात आहेत शाळेमध्ये शक्यतो प्रसाधनग्रहाजवळ महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यात यावे अश्या मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत

यावेळी संभाजी ब्रिगेडच्या महिला जिल्हाध्यक्ष मीनल दास दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष सुनीता घंटे शहर कार्याध्यक्ष जयश्री जाधव मोनाली धुमाळ मनिषा कोळी आदी उपस्थित होते.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**




दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)



**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) भारताचे एक माजी राष्ट्रपती २) आडोसा म्हणून वापरतात ते वस्त्र ३) शाहिराचे वाद्य ४) भव्य इमारत ५) भाविक पंढरपूरला पायी करतात ती ६) कामाचा पैसे स्वरूपातील मोबदला ७) धातूचा तंतू ९) प्रसिध्द उद्योजक - *** टाटा ११) एक शस्त्र १३) धावपटू (इंग्रजीत) १४) लग्नमंडपातील वधू मुलगी १६) निवडणुकीत उमेदवाराला देतात ते व्होट १९) मत देण्याची क्रिया २०) वर्तुळ २१) थोरल्या बंधूला या नावाने संबोधतात २३) राजवाड्यातील दालन २४) कष्ट, कसरत २६) दु:ख (हिंदीत) २७) महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री - ****** चव्हाण २८) दोन+दोन २९) राज्य चालविणारे शासन ३०) एक मराठी महिना ३१) लोकसभेवर निवडून देतात तो प्रतिनिधी ३३) ऐकण्याचे इंद्रिय ३५) महादेव जानकर यांचा पक्ष ३७) मुस्लीम बांधवांचा पवित्र महिना, सण ३८) एक डॉन - अरूण *** ४०) नेत्र ४३) लहान मूल ४७) पारंब्या असलेला वृक्ष ४८) पक्ष्याचे पंख (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) एक ऐतिहासिक किल्ला
४) तुळजापूर येथील प्रख्यात दैवत
८) फेब्रुवारी (हिंदीत) १०) स्वर्गच्या विरूध्दार्थी १२) देवाने दिलेला आशिर्वाद
१५) शरीर, काया १६) माश्यांनी गोळा केलेला एक गोड द्रवपदार्थ
१७) चंद्र (इंग्रजीत) १८) उलटी, ओकारी येणे २०) वतनाचा मालक
२२) झणझणीत, आवेशयुक्त २४) पत्राची जागा या इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजीने घेतली आहे : जी -** २५) आबाळ, हेळसांड २९) सुलतान चित्रपटाचा नायक
३२) प्रसिध्द (हिंदीत) ३३) छोटी चारचाकी प्रवासी गाडी ३४) नऊ+आठ
३६) होकारच्या विरूध्दार्थी ३८) हनुमान देवताच्या हातातील शस्त्र
३९) आरोपांमुळे चर्चेत आलेली हिंदू संस्था ४१) एक विदेशी मद्य
४२) नवऱ्या मुलाचे वडील
४४) शूर सरदार तानाजी मालुसरे यांच्या मुलाचे नाव
४५) एक मंत्र - * गं गणपतये नम: ४६) छ. शिवरायांनी बंडखोर मोरे यांचे खालसा केलेले संस्थान
४८) वायू, वारा ४९) गरज, अडचण
५०) ऋतिक रोशन अभिनीत हिंदी चित्रपट - जोधा **** ५१) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 212

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | | 4 | | | | 7 |
| | 4 | | | 2 | 1 | 3 | 9 | |
| 1 | 9 | | | | | | 8 | |
| 3 | 7 | 8 | 2 | | | | 1 | |
| 4 | | | 5 | 1 | 8 | 7 | | |
| | | 1 | 4 | | | | 2 | |
| | 1 | 3 | 7 | | | | 4 | |
| 2 | 5 | 7 | 9 | | | 8 | 3 | |
| 9 | | | | | 3 | | 7 | 2 |

# रमजान ईद निमित्त आझाद युवा फाउंडेशनच्यावतीने आवश्यक वस्तूंचे किट वाटप

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** रमजानच्या पवित्र महिना चालू असून रमजान ईद चार पाच दिवसावर असतानाच सालाबाद प्रमाणे याही वर्षी मुस्लिम समाजातील गोरगरीबांना रमजान सणाला आवश्यक लागणार्या वस्तुंचे किट वाटप करण्यात आले.



आझाद युवा फाउंडेशन वतीने सामाजिक कार्य म्हणून दिवाळी सणा निमित्ताने गोरगरीब हिंदू बांधवांना ही दिवाळी सणाला लागणाऱ्या वस्तुंचे वाटप वाटप करण्यात येते तसेच आझाद युवा फाउंडेशनच्या वतीने कायम हिंदू -मुस्लिम सलोख्याचे संबंध राखण्यासाठी प्रयत्नशील असते.

यावेळी बोलताना आझाद युवा फाउंडेशन चे अध्यक्ष अजीज शेख म्हणाले आम्ही सालाबाद प्रमाणे रमजान ईद निमित्त मुस्लिम समाजातील गरजवंत लोकांना ईद ला लागणारे सर्व वस्तूंचे किट दिले असुन यापुढे ही आमची आझाद युवा फाउंडेशन ची टीम सर्व समाज बांधवांना सहकार्य करत रहाणार आहे व ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाचे आपण देणे आहे असेच समजतो तेच या माध्यमातून छोटीशी मदत म्हणून करत आहोत यावेळी आम्हाला उद्योजक अय्युबभाई पटेल व जावेद शेख यांचेही विशेष सहकार्य लाभले त्यांचे आझाद युवा फाउंडेशनच्या वतीने विशेष धन्यवाद असे सांगितले.

यावेळी आझाद युवा फाउंडेशन चे उपाध्यक्ष समीर जहागिरदार, सचिव इम्तियाज सय्यद, खजिनदार आसिफ शेख, सर्वेसर्वा डॉ शहाजहान काझी, उद्योजक अय्युबभाई पटेल, जावेद शेख,अमिर काझी,रब्बेसलाम शेख,अस्लम शेख, फारुख देशमुख, इम्रान बागवान आदी उपस्थित होते.

# विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे हे दि.30 व 31 मार्च 2025 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढील प्रमाणे.

रविवार दि.30 मार्च 2025 रोजी रात्री 11 वाजता शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे आगमन व मुक्काम.

सोमवार दि.31 मार्च 2025 रोजी सकाळी 07 वाजता शासकीय विश्रामगृह येथून विठ्ठल रूक्मीणी मंदिराकडे प्रयाण व सकाळी 7.10 वा. विठ्ठल मंदिर येथे आगमन व दर्शन. त्यानंतर सकाळी 8.00 वा. पंढरपूर येथून शासकीय वाहनाने बायपास रोड बेलाटी ता. उत्तर सोलापूर कडे प्रयाण व 9.30 वा. बेलाटी,येथे संत श्री बाळूमामा मंदिरास भेट व दर्शन. सकाळी 10.30 वा. बेलाटी ता. उत्तर सोलापूर येथून शासकीय वाहनाने हेरिटेज गार्डन गांधीनगर सोलापूर कडे प्रयाण व 11.00 वा. हेरिटेज गार्डन येथे आयोजित सत्कार समारंभास उपस्थिती. दुपारी 01.00 वा. शासकीय वाहनाने सोलापूर विद्यापीठ कडे प्रयाण. दुपारी 1.30 वा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे आगमन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याची पाहणी व राखीव. दुपारी 02.30 वा. सोलापूर विद्यापीठ येथून शासकीय वाहनाने पंढरपूर कडे प्रयाण व सायं.05.00 वा. हनुमान मैदान ग्रा.पं.कार्यालयासमोर ईश्वर वठार ता. पंढरपूर येथे आगमन व अॅड .प्रा. श्री वामनराव माने यांच्या अमृत महोत्सव सोहळा कार्यक्रमास उपस्थिती. व त्यानंतर सायं.07.00 शासकीय वाहनाने निर निमगाव ता. इंदापूर कडे प्रयाण करतील.

# हिंदू-मुस्लीम भाईचारा महत्त्वाचा- महारुद्र परजणे





**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** रमजान हे पवित्र पर्व मानले जाते. मुस्लीम बांधव रमजानमध्ये संपूर्ण महिना उपवास करतात. रमजान काळात शरीर व मनाचे शुद्धीकरण करून जी दुवा मागितली जाते. तिची पूर्ती होते, अशी श्रद्धा आहे. सर्वधर्मीय एकत्र येऊन इफ्तार पार्टीत गुण्यागोविंदाने सहभागी होतात यातून सर्वधर्म समभाव दिसून येतो. हिंदू-मुस्लीम भाईचारा महत्त्वाचा असल्याचे नातेपुते पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी इफ्तार पार्टीप्रसंगी सांगितले. नातेपुते पोलीस ठाणे यांच्या वतीने नातेपुते येथील शाही मज्जिद येथे इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. २०० मुस्लिम बांधव इफ्तार पार्टीसाठी उपस्थित होते. इफ्तारच्या वेळी रोजाच्या उपवासनिमित्त फळे व मिठाईचे आयोजन नातेपुते पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले होते.यावेळी सपोनि महारुद्र परजणे यांनी मौलाना मेराज समशी यांना हार घालुन रमजान महिना उपवासाच्या व ईदच्या शुभेच्छा दिल्या तर मुस्लिम बांधवांच्या वतीने सपोनी महारुद्र परजणे यांचाही हार घालून सन्मान करण्यात आला. यावेळी नातेपुते पोलीस ठाणे व सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने उपस्थित सर्व मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा देऊन रमजान ईद, गुढीपाडवा तसेच इतर सणानिमित्त हद्दीत कोठेही कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होऊ नये याबाबत दक्षता घेण्याचे आवाहन नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने मुस्लिम बांधवांना इफ्तार पार्टी दरम्यान केले.यावेळी मौलाना मेराज समशी, आमिन काझी, निजाम काझी, नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे, गोपनीय विभागाचे अमोल देशमुख, पो.कॉ. नवनाथ चव्हाण, पो.कॉ. मदने, पो.कॉ. बोराटे तसेच होमगार्ड पथकातील होमगार्ड जवान, आरपीआयचे एन.के. साळवे, युवराज वाघमारे, बाळासाहेब सोरटे तसेच मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# जैनवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी शोभा गोफणे यांची बिनविरोध निवड



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील जैनवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी सौ शोभा नेताजी गोफणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना अॅड. दिपक दादा पवार यांनी नूतन सरपंच यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या,यावेळी अध्यासी अधिकारी श्री आर. ए. शिंदे, ग्राम महसूल अधिकारी संदीप शिनगारे, ग्रामपंचायत अधिकारी अविनाश ढोपे, उपसरपंच सौ. कल्पना शिंगटे, ग्रामपंचायत सदस्य सौ. मधुरा पवार,सौ. कल्पना माने, श्रीमती. रुक्मिणी गोफणे, सौ. संगिता गोफणे, श्री. हणमंत सोनवले, श्री.अशोक सदलगे तसेच, महादेव लिंगडे, किरण दानोळे, दिनेश मिरजे, नेताजी गोफणे, विलास गोफणे, मोहन माने, हिम्मत हसुरे, विजय साळवे, संजय गोफणे, मच्छिंद्र गोफणे, पांडुरंग जमदाडे, गणेश जमदाडे, चंद्रप्रभू मिरजे, दत्तात्रय सुतार, बाबासो दानोळे, कुमार शिंगटे, शिवाजी पवार, रमेश इंगोले, सुभाष पवार, जालिंदर गोफणे, धनाजी गोफणे, अनिल शिंदे, बाळासो जमदाडे, बाळासो पवार, सुकुमार मिरजे, मल्हारी गोफणे, सुरेश भोसले, मनोज मिरजे, कुमार पवार, सत्यवान गोफणे, गणपतराव दासरे, सुहास पवार व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.













